जिल्हा तांत्रिक सेवा (शिक्षण) गट-क या संवर्गातील कर्मचाऱ्यांना उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब, महाराष्ट्र शिक्षण सेवा, (प्रशासन शाखा) या पदावरील खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती- निवडसूची २०१७-१८

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : निसूची-३६१८/प्र.क्र.२५/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १६ सप्टेंबर, २०१९

शासन आदेश -

जिल्हा तांत्रिक सेवा, गट-क (शिक्षण) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार उपशिक्षणाधिकारी व तत्सम, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) या पदावरील खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) (सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी रु.९३००-३४८००-ग्रेड पे रु.४८००) या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

अनु क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	ज्येष्ठता क्रमांक	मूळ प्रवर्ग	प्रवर्गातून पदोन्नती	महसुली विभाग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१	२	३	४	५	६	७
१	श्री. अशोक बाबुराव देशमुख	३६१४	खुला	खुला	पुणे	गटशिक्षणाधिकारी, पं.स. गडहिंग्लज, कोल्हापूर
२	श्री. सुदाम रूपला राठोड	३८०१ब	वि.जा.अ.	खुला	औरंगाबाद	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. बीड
३	श्री. विद्याधर वामनराव देशपांडे	३९२४	खुला	खुला	औरंगाबाद	उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. परभणी
४	श्री. पूनम प्रेम म्हस्के	३९२६	खुला	खुला	नागपूर	उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. चंद्रपूर
५	श्री. चंडिदास माधवराव देशपांडे	३९२९	खुला	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. कंधार, जि. नांदेड
६	श्री.दिलीप लक्ष्मणराव करंजीकर	३९४२	खुला	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. केज, जि. बीड
७	श्रीमती शफीकाबानु अब्दुल शकुर शत्तारी	३९७३	खुला	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. निलंगा, जि. लातूर

अनु क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	ज्येष्ठता क्रमांक	मूळ प्रवर्ग	प्रवर्गातून पदोन्नती	महसुली विभाग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१	२	३	४	५	६	७
८	श्री.विठ्ठीबा देवराम जायभाये	३९७८	भ.ज.ड	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. जालना, जि. जालना
९	श्री. विश्वनाथ हरी जोग	४००९	खुला	खुला	नागपूर	सहायक सचिव, म.रा.मा.व उ.मा.शि.मं. नागपूर
१०	श्रीमती साधना कुलभूषण धर्मराव	४०१६	खुला	खुला	पुणे	कार्यक्रम अधिकारी, म.रा. शै. सं. व प्र. प. पुणे
११	श्री. अविनाश किसनराव देशमुख	४०२८	खुला	खुला	पुणे	कार्यक्रम अधिकारी, म.रा. शै. सं. व प्र. प. पुणे
१२	श्री. खुर्शीद अहमद अजीज बरोटे	४०३०	इ.मा.व.	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद
१३	श्री. मोहन देविदास पवार	४०४७	इ.मा.व.	खुला	नागपूर	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. चंद्रपूर
१४	श्री. प्रकाश वसंत ढवंगळे	४०४८	इ.मा.व.	खुला	नागपूर	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. नागपूर
१५	श्री. मोहुद्दीन साबीर शेख	४०६२	खुला	खुला	अमरावती	उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. यवतमाळ
१६	श्री. बबनराव केदेराव देशमुख	४०६३	खुला	खुला	अमरावती	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. वाशिम
१७	श्री. मोहमद अब्दुल सामी	४०८१	खुला	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स. परभणी, जि. परभणी
१८	श्री.वेंकटाचारी रामाचारी आरवेल्ली	४०८१अ	खुला	खुला	नागपूर	गटशिक्षणाधिकारी, पं.स. धानोरा, जि. गडचिरोली
१९	श्री. हेमराज कचरू दहिवले	४०८३क	अ.जा.	खुला	नागपूर	गटशिक्षणाधिकारी, पं.स. भंडारा, जि. भंडारा
२०	श्री. विलास चंद्रकांत जोशी	४०८५	खुला	खुला	औरंगाबाद	गटशिक्षणाधिकारी, पं.स.परळी, जि. बीड
२१	श्री. बाबुराव बळीराम पारधी	४०८५ब	इ.मा.व.	खुला	नागपूर	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. गोंदिया
२२	श्री. दिलीप खुशाल तायडे	४०८५क	इ.मा.व.	खुला	अमरावती	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. अकोला
२३	श्री. प्रकाश नथ्थूजी करणकोटे	४०८६	इ.मा.व.	खुला	नागपूर	उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.भंडारा
२४	श्री. प्रकाश तुळशिराम अंधारे	४१०६ब	इ.मा.व.	खुला	अमरावती	उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. वाशिम

अनु क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	ज्येष्ठता क्रमांक	मूळ प्रवर्ग	प्रवर्गातून पदोन्नती	महसुली विभाग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१	२	३	४	५	६	७
२५	श्री. अशोक मारोती पाटील	४१४४	इ.मा.व.	खुला	अमरावती	गटशिक्षणाधिकारी, पं.स. बुलढाणा, जि. बुलढाणा
२६	श्री. विकास मोतीराम बगाडे	४१४६	इ.मा.व.	खुला	अमरावती	गटशिक्षणाधिकारी, पं.स. अकोला, जि. अकोला
२७	श्री. अर्जुन राजाराम मलदोरे	४१५५	अ.ज.	खुला	औरंगाबाद	उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक, जि. प. हिंगोली

२. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निकालाच्या अधीन राहून केवळ तात्पुरत्या स्वरूपात सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णयानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना पदोन्नतीने देण्यात आलेली पदस्थापना ही, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक २८.०४.२०१५ व त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणेनुसार महसूल विभाग संवर्ग वाटप नियमांच्या तरतुदीनुसार करण्यात आली आहे. पदोन्नती घेतलेल्या अधिकाऱ्यांना त्यांना वाटप करण्यात आलेल्या महसुली विभागात किमान सहा वर्षे सेवा करणे बंधनकारक आहे .

४. संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी रूजू होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबंधित अधिकारी यांनी पदोन्नती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे. रूजू झाल्याचा दिनांक आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास कळवावा. जे अधिकारी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीमध्ये रूजू होणार नाहीत, त्यांनी पदोन्नतीस नकार दिला आहे, असे गृहीत धरण्यात येईल व त्यांना सेवांतर्गत प्रगती योजनेंतर्गत लाभ दिले असल्यास ते काढून घेण्यासंदर्भात वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन आदेश / निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १२.०९.२०१६ मधील तरतुदीनुसार पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूचीमध्ये अशा अधिकाऱ्यांचा विचार करता येणार नाही.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ व दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ मधील तरतुदीच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यात आलेले वरील अधिकारी पदोन्नतीची पदावर रूजू होईपर्यंत त्यांच्या विरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू झाल्यास अथवा फौजदारी खटला दाखल झाल्यास अथवा प्रलंबित असल्यास अथवा विभागीय पदोन्नतीच्या दिनांकास शिक्षेचा अंमल

सुरू असल्यास, अशा अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी कार्यमुक्त करू नये. तसेच ज्या ठिकाणी पदोन्नती देण्यात आली आहे, त्या संबंधित कार्यालय प्रमुख अथवा नियंत्रण अधिकाऱ्यांनी अशा अधिकाऱ्यांना रूजू करून घेऊ नये. आयुक्त (शिक्षण) यांनी निवडसूचीतील सर्व अधिकाऱ्यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तसेच मत्ता व दायित्व सादर केले आहे याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे मागासवर्गीय अधिकाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याबाबत शहानिशा करावी. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०९१६१७५११३७३२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.09.17 13:35:25 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
३. सर्व संचालक
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
५. सर्व शिक्षणाधिकारी
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७. सर्व संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी अग्रेषित,

१) मा. मंत्री (शा.शि.व क्री.) यांचे विशेष कार्य अधिकारी
२) अपर मुख्य सचिव सचिव (शा.शि. व क्री. विभाग) यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती